


गोवा वेल्हा : टीम पालासिओसोबत विनय भासीन व मोहीत गुप्ता.

# पालासिओ समूहातर्फे नाताळनिमित्त विशेष कार्यक्रम

गोवा वेल्हा, ता. २३ : ग्लेनवूड गार्डन्स येथील क्लब निर्वाणामध्ये पालासिओ समूहाचा नाताळनिमित्त विशेष कार्यक्रम झाला. त्यामध्ये 'गोव्यात कोण कोणाचे' या शीर्षकाखाली आगळावेगळा कार्यक्रम झाला.

पालासिओ टीमने निमंत्रितांची सरबराई केली. या समूहाने या वर्षात साध्य केलेली उद्दिष्टे साजरी करण्याकरिता हा कार्यक्रम झाला. विनय बासिन यांनी त्याबाबत समाधान व्यक्त केले व आपल्या टीमला शुभेच्छा दिल्या.

पालासिओ मार्केटिंग प्रमुख शामेन कुतिन्हो यांनी यावेळी सांगितले, की या वर्षात आम्ही अनेक हरित उपक्रम व ग्राहक मैत्रीपूर्ण प्रक्रिया राबविल्या आहेत व त्यामुळे उद्दिष्टे साध्य करणे शक्य झाले.

गोवा वेल्हा येथे आयोजित हा आगळावेगळा कार्यक्रम पाहण्यासाठी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

Gomantak - 24th December 2013